॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा /२०२४-२५/३७३५ दिनांक : ०६/०२/२०२५

# महत्त्वाचे परिपत्रक उन्हाळी-२०२५ (परीक्षा शुल्क व आवेदनपत्राबाबत)

**प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ पदवी (सर्व** B.A./B.Com./B.Sc./BCA/BCS and All B.Voc. etc.**) व पदव्युत्तर (सर्व** M.A./M.Com./M.Sc./MCA and and All M.Voc. etc.**) परीक्षेकरिता परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ तसेच न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपपरिसर लातूर, उपपरिसर परभणी, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट व प्रस्तुत विद्यापीठ संकुले यांना कळविण्यात येते की पदवी (सर्व B.A./B.Com./B.Sc./BCA/BCS and All B.Voc. etc.) व पदव्युत्तर (**सर्व** M.A./M.Com./M.Sc./MCA and All M.Voc. etc.) अभ्यासक्रमांच्या उन्हाळी-२०२५ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरीता सूचना खालीलप्रमाणे आहे.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख :

अ. नियमित शुल्कासह महाविद्यालयात आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम **दिनांक २८/०२/२०२५**.

ब. रु. १००/- विलंब शुल्कासह महाविद्यालयामध्ये परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम **दिनांक १०/०३/२०२५.**

**('अ' व 'ब' नुसार परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात येईल.**)

क. दिनांक ११/०३/२०२५ ते दिनांक १७/०३/२०२५ पर्यंत नियमित व विलंब शुल्कासह प्रतिदिवस रु.५०/- अतिविलंब शुल्क आकारून महाविद्यालयातच सदर परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारून दिनांक १८/०३/२०२५ रोजीचा धनाकर्ष काढावा किंवा NEFT/RTGS करावे व दिनांक १९/०३/२०२५ रोजी आवेदनपत्र विद्यापीठात सादर करावेत.

०३. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा DD/NEFT/RTGS हे B.A., B.Com., B.Sc. इत्यादी असे विद्याशाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्रपणे **मा. वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांच्या नावे काढावा. तो DD/NEFT/RTGS **दिनांक १३/०३/२०२५** किंवा त्या पूर्वीच्या तारखेचा असणे आवश्यक आहे अथवा खालीलप्रमाणे IDBI बॅंकेच्या खात्यामध्ये अभ्यासक्रमनिहाय/विद्याशाखानिहाय NEFT/RTGS द्वारे **दिनांक १३/०३/२०२५ पर्यंत** भरणा करावा. धनाकर्ष किंवा NEFT/RTGS विहित तारखेनंतर काढल्यास १० दिवसांपर्यंत अभ्यासक्रमनिहाय प्रतीदिन रु.५००/- तर १० दिवसांनंतर अभ्यासक्रमनिहाय प्रतीदिन रु.१,०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

धनाकर्ष/NEFT/RTGS **द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त काढू नये. तसे केल्यास अतिरिक्त असलेली रक्कम इतरत्र वर्ग केली जाणार नाही किंवा परत केली जाणार नाही.**

**Bank Details for NEFT/RTGS/Online Payment:**

**Name of the A/c Holder : Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**

**Name of Bank : IDBI Bank, Nanded.**

**IFSC Code : IBKL0000500 A/c Number-500104000028422**

०४. वरीलप्रमाणे सर्व अभ्यासक्रमांची **परीक्षा आवेदनपत्रे ही ऑनलाईन** पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी **दिनांक ०५/०२/२०२५ ते दिनांक १०/०३/२०२५** पर्यंत ऑनलाईन लिंक चालू राहील. परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून **दोन प्रतिमध्ये** परीक्षा आवेदनपत्रांसोबत सादर करण्यात यावी.

**महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्रे व विहीत शुल्काचा** DD/NEFT/RTGS **सह विद्यापीठात सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १०१-१११) | १९/०३/२०२५ | प्रस्तुत विद्यापीठ, परीक्षा विभाग |
| ०२ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ११२-१२१) | १८/०३/२०२५ | |
| ०३ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १२२ व त्यापुढील सर्व) | १७/०३/२०२५ | |
| ०४ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २०१-२११) | १९/०३/२०२५ | उपपरिसर, परभणी प्रस्तुत विद्यापीठ |
| ०५ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २१२-२२१) | १८/०३/२०२५ | |
| ०६ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २२२ व त्यापुढील सर्व) | १७/०३/२०२५ | |
| ०७ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३०१-३११) | १९/०३/२०२५ | उपपरिसर, लातूर प्रस्तुत विद्यापीठ |
| ०८ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३१२-३२१) | १८/०३/२०२५ | |
| ०९ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३२२ व त्यापुढील सर्व) | १७/०३/२०२५ | |



...... पाहा पृष्ठ २ ....

०५. वरीलप्रमाणे विहित तारखेस परीक्षा आवेदनपत्रे सादर न केल्यास महाविद्यालयास प्रति दिन प्रति विद्यार्थी रु.२/- किंवा यापैकी जे जास्त असेल, ते विलंब शुल्क आकारण्यात येईल.

०६. परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क रु.०५/- स्वतंत्र आकारण्यात यावे.

०७. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी (Sem.-I &II, Sem.-III & IV, Sem.-V & VI) स्वतंत्र परीक्षा आवेदनपत्र भरण्यात यावे. तसेच नियमित व अनियमित (बॅकलॉग) परीक्षांच्या आवेदनपत्रांचे स्वतंत्र गठ्ठे बांधण्यात यावेत.

०८. परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना प्रथम नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे त्यानंतर अनियमित (बॅकलॉग) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे या प्रमाणे वर्गनिहाय सादर करावेत.

०९. **परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना महाविद्यालयांनी अभ्यासक्रमनिहाय नियमित/ठराविक व तासिका तत्वावरील प्राध्यापकांची यादी (चार सत्र शिकविण्याचा अनुभव असलेल्या प्राध्यापकांची यादी) सोबत जोडलेल्या** Google Form **मध्ये भरून देण्यात यावी. परीक्षा आवेदनपत्रे परीक्षा विभागात सादर करताना संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडावी.**

१०. **परीक्षा आवेदनपत्रे अग्रेषित करताना महाविद्यालयातील अभ्यासक्रम व त्यातील संबंधित विषयास संलग्निकरण आहे काय? व हा विषय चालू आहे काय? तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता संलग्निकरण शुल्क भरले असल्याची खात्री करूनच परीक्षा आवेदनपत्रे सादर करावीत. तसेच मा. संचालक, क्रीडा विभाग, मा. संचालक, रा.से.यो. तसेच संलग्निकरण विभागाकडून महाविद्यालयांनी आवश्यक ते शुल्क भरलेले आहे, याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्याशिवाय त्या महाविद्यालयाचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. उशिराने वरीलप्रमाणे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्यास नियमाप्रमाणे (सूचना क्र. ५ प्रमाणे) परीक्षा आवेदनपत्र स्वीकारताना विलंब शुल्क आकारले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.**

११. **हिवाळी-२०२४ च्या परीक्षेसाठी सुधारीत परीक्षा शुल्काप्रमाणे परीक्षा शुल्क घेण्यात यावे**. (सुधारीत परीक्षा शुल्काचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

१२. **तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय/चतुर्थ सत्राकरिता परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना प्रथम व द्वितीय/तृतीय सत्राच्या उत्तीर्ण गुणपत्रिकेची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.**

१३. **नवीन CBCS अभ्यासक्रम चालू असल्याने CBCS जुन्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना दिलेल्या परीक्षेच्या तीन संधी संपलेल्या असल्यामुळे CBCS जुन्या अभ्यासक्रमांतील एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी सध्या चालू असलेल्या CBCS नवीन अभ्यासक्रमांनुसार सर्व विषय घेऊन परीक्षा आवेदनपत्रे भरणे अनिवार्य आहे.**

१४. **NEP अभ्यासक्रम लागू झाल्यामुळे CBCS अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेच्या तीन संधी नियमाप्रमाणे देय राहतील. त्यानुसार कला, वाणिज्य व विज्ञान पदव्युत्तर अभ्यासक्रमातील CBCS जुना अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना उन्हाळी-२०२५ ही परीक्षा, परीक्षा देण्याची शेवटची संधी राहील.**

१५. **परीक्षा आवेदनपत्रे सादर करताना त्यासोबत विद्यार्थ्यांची ABC-ID रजिस्ट्रेशन केल्याची यादी सादर करावी. त्याशिवाय परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.**

१६. **दिनांक २५ जुलै २०२३ रोजी झालेल्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील विषय क्र.१३-२१/२०२३ मध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांकडून अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्राच्या परीक्षा आवेदनपत्र व शुल्कासोबत पदवी प्रमाणपत्र शुल्क रु.१८०/-घेण्यात यावेत, असे ठरले आहे. याकरिता Online Link विद्यापीठाच्या वेबसाईटवर Convocation शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. (केवळ उन्हाळी परीक्षेसाठी लागू राहील.).**

१७. **जे विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रमाच्या, अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी प्रमाणपत्रासाठी आवेदनपत्र भरणार नाहीत, त्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. (केवळ उन्हाळी परीक्षेसाठी लागू राहील.).**

१८. **NEP-2020 पॅटर्नच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या I, II, III व IV सत्राच्या विद्यार्थ्यांनी त्यांना पुरवठा करण्यात आलेल्या Mobile App मधूनच परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क भरुन त्याची हार्ड कॉपी ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या महाविद्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.**

तरी वरील सूचनांची नोंद घेऊन ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

**प्र. संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**<u>प्रत माहितीस्तव :-</u>**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र. वित्त व लेखाअधिकारी यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**<u>प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :</u>**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, लातूर व परभणी उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
४. मा. संचालक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, जि. नांदेड.
५. सर्व विभागप्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६. समन्वयक, एमकेसीएकल, प्रस्तुत विद्यापीठ.